ePaper

# गौरी गणपती, दिवाळीसाठी 100 रुपयांत आनंदाचा शिधा!



| वर्ष - 7 | अंक - 107 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™


लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- एशियन गेम्स : भारताला धक्का!
- प्राजक्ताचा नवा सिनेमा
- लालूंची अडचण वाढणार?
- दिग्गज साहित्यिकांचे बापच बदलले!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 19 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चार हजार वाहनधारकांना 'आरटीओ'चा दणका!



## विना हेल्मेट प्रवास पडला महागात

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विना हेल्मेट चालविणाऱ्या वाहनधारकांवर पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने कारवाईचा बडगा उगारला आहे. या वर्षी कार्यालयाच्या वतीने सुमारे 4 हजार पेक्षा अधिक विना हेल्मेट दुचाकी चालकांवर आरटीओच्या वतीने कारवाई करण्यात आलेली आहे. जुलै महिन्यात 1 हजार 486 विना हेल्मेट प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांवर कारवाई करण्यात आली आहे.**

पुणे जिल्ह्यात प्राणांतिक अपघातामध्ये दुचाकीस्वारांचे प्रमाण इतर वाहनांच्या तुलनेत अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी परिवहन विभागाने कंबर कसली आहे. तसेच दुचाकीवरून प्रवास करताना हेल्मेटचा वापर करावा यासाठी लोकांना विविध माध्यमातून विनंती केली जात आहे. महाराष्ट्र राज्यात सन 2022 व 2023 मध्ये घडलेल्या अपघातांचे तुलनात्मक विश्लेषण केले असता, एकूण रस्ते अपघातामध्ये दुचाकी व पादचाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या अपघातांमध्ये 70 ते 80 टक्के अपघात हे फक्त दुचाकी व पादचाऱ्यांचे आहेत. ही बाब रस्ता सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अतिशय चिंताजनक आहे.

### हेल्मेटअभावी अपघाती मृत्यू वाढले

वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करणे हे रस्ता सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे आहे. बहुतांशी दुचाकी वाहनाच्या अपघातांमध्ये जखमी होणारे अथवा मृत पावणारे वाहनस्वार हे हेल्मेटशिवाय प्रवास करणारे आहेत. त्यामुळे हेल्मेट वापरण्यासंबंधी प्रबोधनात्मक व अंमलबजावणी विषयक व्यापक मोहीम पिंपरी चिंचवड आरटीओ कडून राबविण्यात येत आहे. मोटार वाहन कायदा, 1988 मधील कलम 194 ड मधील तरतुदीनुसार हेल्मेट वापरासंबंधी तरतुदींचा भंग करणाऱ्या अथवा त्यास संमती देणाऱ्या व्यक्तीस दंडाची तरतूद आहे.



### आरटीओची प्रबोधनात्मक नोटीस

सर्वप्रथम पिंपरी चिंचवड आरटीओ कडून विविध खाजगी कार्यालये, शाळा, कॉलेज तसेच विविध शासकीय आस्थापनांमध्ये हेल्मेट वापराविषयी प्रबोधनात्मक नोटीस देण्यात आल्या. तसेच विविध ठिकाणी याविषयी प्रबोधनात्मक सत्र घेण्यात आली. या माध्यमातून दुचाकी चालवताना हेल्मेट वापरणे का गरजेचे आहे हे विविध उदाहरणे तसेच सादरीकरणाच्या माध्यमातून समजावून देण्यात आले आहे अशी माहिती कार्यालयाच्या वतीने देण्यात आली.

# विकसकांवरच विक्री न झालेल्या सदनिकांच्या देखभालीची जबाबदारी

## उपनिबंधक पुणे 3 कार्यालयाचा निर्णय

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विक्री न झालेल्या सदनिकांच्या देखभालीची जबाबदारी आता बांधकाम व्यावसायिक अथवा विकसकांचीच असल्याचा निकाल उपनिबंधक पुणे 3 कार्यालयाने दिला आहे. कार्यालयाच्या या निर्णयामुळे गृहनिर्माण सहकारी संस्थांना दिलासा मिळाला आहे. उपनिबंधक नागनाथ कंजेरी यांनी हा निकाल दिला आहे.**

पुनावळे येथील एका सोसायटीच्या देखभाल निधीबाबत माय होम कॉपरेटिव्ह सोसायटीने एका संस्थेच्या संचालकाविरोधात दोन वर्षांपूर्वी उपनिबंधक यांच्याकडे दावा दाखल केला होता. सर्व तपासाअंती उपनिबंधकांनी सोसायटीला रिकव्हरी सर्टिफिकेट जारी केले आहे. यामध्ये देखभाल शुल्क, व्याज शुल्क व कायदेशीर शुल्कासह सहा लाख 24 हजार 310 रुपये थकबाकी बांधकाम व्यावसायिक वा वा विकसकाला विक्री न झालेल्या सदनिकांचा देखभाल निधी सोसायटीला देण्याचे निर्देश दिले आहेत.

हा निर्णय व नियम सोसायटी सभासदांना व विकसकांनाही लागू होतो. विकसकाची मालकी असलेल्या किंवा ती सदनिका विकल्या न गेलेल्या फ्लॅटसाठी सोसायटीच्या उर्वरित सदस्यांप्रमाणेच कोणत्याही सवलतीशिवाय देखभालीची रक्कम त्याने भरणे आवश्यक असल्याचे उपनिबंधक कार्यालयाने सांगितले आहे.



# पुण्यातील पबमध्ये तिरंगा ध्वजाचा अवमान!

## आरोपीच्या अटकेसाठी भाजपचे टाळाठोको आंदोलन

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील हॉटेल फ्रीक-सुपर क्लब या ठिकाणी १३ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री तिरंगा ध्वजाचा अपमान झाला यासंदर्भात अतिशय साधी कलमं लावून पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु आरोपीला अद्यापही अटक झालेली नाही आणि किंवा तत्सम कारवाई झाली नाही.**





तसेच ते हॉटेल अद्यापदेखील चालूचं आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक झाली पाहिजे आणि आणि हॉटेल मालकाला सुद्धा अटक झाली पाहिजे. तसेच जोपर्यंत हॉटेल मालक आणि आरोपी जाहिरपणे माफी मागत नाहीत तोपर्यंत हे हॉटेल बंद रहावे ही आमची मागणी आहे. या मागणीसाठी आणि यातून सर्व पबचालकांना समज मिळावी, सर्रास चालणारे अवैध धंदे, धांगडधिंगे बंद व्हावे यासाठी हॉटेल फ्रिक ,सुपर क्लब,कोरेगाव पार्क याठिकाणी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तर्फे टाळा ठोको आंदोलन करण्यात आले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत हॉटेल पूर्णपणे बंद करण्यात आले. भाजपा पुणे शहरअध्यक्ष धीरज घाटे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस सुशील मेंगडे, पुणे शहर युवा मोर्चा अध्यक्ष राघवेंद्र बापू मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन पार पडले.

यावेळी युवा मोर्चा कॅन्टोन्मेंट मतदार संघ अध्यक्ष आशिष सुर्वे, शहर सरचिटणीस ओंकार केदारी, राजु परदेशी, प्रदेश पदाधिकारी अनिकेत हारपुडे, रोनक शेट्टी, ओबीसी युवा मोर्चा अध्यक्ष तुषार रायकर, युवा वॉरीयर्स अध्यक्ष प्रतिक गुजराथी, शहर पदाधिकारी प्रतीक कुंजीर, प्रणय शिंदे, सुरेंद्र ठाकूर, निलेश कांबळे, ओमकर धुमाळ इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### हॉटेल बंदच व्हायला हवे...

» जर उद्या परत हॉटेल सुरु झाले तर आम्ही ह्याचा समाचार घेतल्याशिवाय राहणार नाही. कारण राष्ट्रध्वज आमच्यासाठी जीवापेक्षा मोठा आहे असा इशारा युवा मोर्चा आणि युवा वरियर्स तर्फे देण्यात आला आहे.

# एसटीची पहिली स्लीपर बस तयार!

## खूशखबर: स्लीपर बसची बांधणी पूर्ण

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात प्रवाशांकडून लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सर्वाधिक मागणी असलेली पहिल्या 'शयनायान' (स्लीपर) बसची राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दापोडी येथील कार्यशाळेत बांधणी पूर्ण झाली आहे. या बसची प्रादेशिक परिवहन विभागाकडे (आरटीओ) नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. येत्या काही दिवसांत ही बस प्रत्यक्ष सेवेत दाखल होणार आहे. येत्या काही दिवसांमध्ये दहा बसची बांधणी पूर्ण होणार असून, त्या विविध विभागांना वितरीत करण्यात येणार आहे.**



### शयनयान बसची काही वैशिष्ट्ये...

- आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रवाशांना सावध करण्यासाठी चालक केबिनमध्ये अनाउन्सिंग सिस्टीम
- प्रवाशांचे सामान ठेवण्यासाठी डाव्या बाजूला सामान कक्ष
- बाहेरील उजेडाचा त्रास होऊ नये म्हणून खिडक्यांना पडदे
- बर्थमध्ये चार्जिंग सुविधा व मोबाइल ठेवण्यासाठी पाऊच
- बर्थमध्ये वाचनासाठी लॅम्प व निळ्या रंगाचा नाइट लॅम्प
- दिव्यांग व्यक्तीसाठी आसन क्रमांक एक आरक्षित
- आपत्कालीन सुटकेसाठी मागील बाजूस दरवाजा

एसटी महामंडळाकडून अमृतमहोत्सवी वर्ष साजरे केले जात आहे. राज्यातील प्रवाशांची जीवनवाहिनी म्हणून म्हणून लालपरीची ओळख आहे. एसटीमधून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. एसटी महामंडळाच्या ताफ्यात सध्या शिवशाही, शिवनेरी, शिवाई, अश्वमेध, हिरकणी, विठाई अशा विविध प्रकारच्या बसचा समावेश आहे. पण, रात्रीच्या वेळी लांब पल्ल्याचा प्रवास करताना शयनयान बस प्रवाशांना सोयीची ठरते. त्यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी नागरिकांकडून शयनयान बसला प्राधान्य दिले जाते.

त्यामुळेच खासगी ट्रॅव्हल्सच्या शयनायन बसला नेहमीच गर्दी असते. त्यामुळे नागरिकांकडून एसटीनेदेखील शयनयान बस सुरू करण्याची मागणी केली होती. काही महिन्यांपूर्वीच एसटी महामंडळाने शयनयान बसची बांधणी करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार पुण्याच्या दापोडी येथील कार्यशाळेत ५० स्लीपर बस बनविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यापैकी पहिली शयनयान बस बांधून पूर्ण झाली आहे. इतर दहा बस काही दिवसांमध्ये पूर्ण होतील. पहिल्या बसची पासिंगदेखील करण्यात आली आहे. ती प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज झाली असून, एसटीच्या कोकण विभागाला ती दिली जाण्याची शक्यता आहे.

> **“ एसटी महामंडळाची पहिली शयनयान बस बांधून पूर्ण झाली आहे. येत्या काही दिवसांत बसची बांधणी पूर्ण होणार आहे. पहिली बस कोणत्या विभागाला द्यायची याबाबत चर्चा सुरू आहे.**
>
> **- अभिजित भोसले,**
> **जनसंपर्क अधिकारी, एसटी महामंडळ**

# फेसबूकवर महिलेशी बोलणे पडले महागात

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



पिंपरी चिंचवड शहरातील रावेत परिसरात राहणाऱ्या एका 46 वर्षीय व्यक्तीला फेसबुक कॉलवरुन एका अनोळखी महिलेचा फोन आला. संबंधित महिलेने गोड बोलुन सदर व्यक्तीला पुण्यातील वारजे परिसरातील एका हॉटेल मध्ये भेटण्यास बोलवले.

त्यानुसार सदर व्यक्ती त्याठिकाणी भेटीकरिता पोहचला असता तेथे अनोळखी दोनजणांनी सायबरपोलिस असल्याचे सांगत तु हनी ट्रॅप करतो, तुझी चौकशी करावयाची असल्याचे सांगून चौकीला चल म्हणत, एटीएमला घेऊन जाऊन तब्बल 53 हजार रुपये काढून घेत भामटे पसार झाल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी सदर पिडित व्यक्तीने वारजेपोलिसांकडे मनिषा जी नावाची महिला व दोन अनोळखी व्यक्ती यांचे विरोधात फिर्याद दाखल केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर व्यक्ती फेसबुकवर वेगवेगळया पोस्ट पाहत असताना, त्याला मनीषा नावाचे अनोळखी महिलेचा फेसबुक कॉल आला. सदर महिलेने त्याच्याशी चांगल्याप्रकारे गप्पा मारुन त्याला वारजे परिसरातील स्वर्णा हॉटेल याठिकाणी भेटण्यास बोलवले. त्यानुसार सदर व्यक्ती महिलेला हॉटेल मध्ये भेटण्याकरिता पोहचला.

परंतु हॉटेलमध्ये महिलेच्या ऐवजी दोन अनोळखी व्यक्ती आले होत्या. त्यांनी आम्ही सायबरपोलिस असून ‘तु मुलींना ट्रॅप करतो, त्यांचे व्हिडिओ काढतो, हे आम्हाला तपासणी करायचे आहे, आमच्यासोबतपोलिस चौकीला चल’ असे म्हणून त्यास वारजे माळवाडीतील एचडीएफसी बँकेच्या एटीएम मध्ये नेले. त्याठिकाणी त्याला बळजबरीने 53 हजार रुपये एटीएम मधून काढण्यास सांगून ते पैसे घेऊन भामटे पसार झाले. याबाबत वारजे माळवाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक एस ओलेकर पुढील तपास करत आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील 938 सदनिकांसाठी साडेदहा हजार अर्ज!

## » पंतप्रधान आवास योजनेला नागरिकांचा प्रतिसाद

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी आकुर्डीच्या मोहननगर व पिंपरीतील उद्यमनगर येथे बांधलेल्या गृहप्रकल्पातील 938 सदनिकांसाठी ऑनलाइन अर्ज मागविले आहेत. त्याची मुदत 27 ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. आजपर्यंत एकूण 10 हजार 688 अर्ज महापालिकेत जमा झाले आहेत.**



मोहननगर येथील गृहप्रकल्पात एकूण 568 सदनिका आहेत. तर, उद्यमनगर येथील गृहप्रकल्पात एकूण 370 सदनिका आहेत. हे दोन्ही गृहप्रकल्प तयार आहेत. सदनिकेसाठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्ग (ओबीसी) व दिव्यांग असे आरक्षण आहे. मोहननगर येथील सदनिकेसाठी 7 लाख 35 हजार 255 रुपये आणि उद्यमनगर येथील सदनिकेसाठी 7 लाख 92 हजार 699 रुपये स्वहिस्सा लाभार्थ्यांना भरावा लागणार आहे. या घरांसाठी नागरिकांकडून 28 जूनपासून ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात करण्यात आली. ती मुदत संपल्यानंतर 12 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आता ही मुदत वाढून 27 ऑगस्ट करण्यात आली आहे.

आतापर्यंत एकूण 10 हजार 688 नागरिकांनी ऑनलाइन अर्ज केले आहेत. अर्जासोबत नागरिकांनी 10 हजार रुपये अनामत रक्कम व 500 रुपये नोंदणी शुल्क आणि आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन जमा केली आहेत. उद्यमनगर येथील सदनिकांसाठी 4 हजार 282 जणांनी आणि मोहननगर येथील सदनिकांसाठी 6 हजार 306 जणांनी अर्ज भरले आहेत.

### अर्जाची छाननी करून सोडत काढणार

» मोहननगर आणि उद्यमनगर येथील सदनिकांसाठी आलेल्या अर्जांची छाननी केली जाणार आहे. आवश्यक कागदपत्रे देणाऱ्यांची यादी तयार केली जाणार आहे. त्यानंतर महापालिकेच्या वतीने तारीख निश्चित करून सोडत काढली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे वेळेवर त्वरित जमा करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### नागरिकांना दिलासा

» **पंतप्रधान आवास योजनेची मुदत संपत आल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर होता. तसेच महापालिकेने दिलेल्या वेळेत स्वहिस्स्याची रक्कम भरताना तारेवरची कसरत करावी लागत होती. आता 27 ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ दिल्याने नागरिकांना पैशांची जमवाजमव करता येणार आहे. वाढीव वेळेमुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.**

# चिंचवडमधून श्री मंगलमूर्ती द्वारयात्रेला प्रारंभ

## » रविवारी उत्तर द्वार यात्रेने होणार समारोप

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड येथील मोरया गोसावी समाधी मंदिरातून श्रावण प्रतिपदेला निघणाऱ्या द्वारयात्रेला गुरुवारी (दि.१७) सकाळी नऊ वाजता गाजत प्रारंभ झाला. या यात्रेत शेकडो भाविक सहभागी झाले होते.**



श्रावण शुध्द प्रतिपदा ते श्रावण शुद्ध चतुर्थी या चार दिवसांत व्दारयात्रा आयोजित करण्यात येते. गेल्या ४६० वर्षांपासून अधिक काळ ही परंपरा सुरू आहे. चिंचवड देवस्थानचे प्रमुख विश्वस्त मंदार महाराज देव यांच्या हस्ते सकाळी मंगलमूर्ती वाड्यामध्ये विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर मोरया गोसावी यांच्या समाधीचे दर्शन घेऊन व्दारयात्रेला प्रारंभ झाला. श्रावण प्रतिपदेला व्दारयात्रा पूर्वद्वार श्री मांजराई देवीकडे मार्गस्थ झाली.

एम्पायर इस्टेट येथील श्री मांजराई देवी मंदिराच्या विश्वस्तांनी व्दारयात्रेचे स्वागत केले. ही व्दारयात्रा देवीच्या मंदिरात पोहोचल्यानंतर देवीची पूजा, गोंधळ असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. या वेळी चिंचवड देवस्थानचे जितेंद्र देव, किशोर जोशी, विठ्ठल शिंदे, अप्पा कुलकर्णी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शुक्रवारी (दि.१८) दक्षिणद्वार वाकड येथील आसराई देवी मंदिर, शनिवारी पश्चिमद्वार रावेत येथील ओझराई देवी मंदिर येथे दर्शनासाठी जाणार आहे.

रविवारी (दि.२०) उत्तर द्वार म्हणजेच समारोपाच्या दिवशी आकुर्डी येथील मुक्ताई देवी मंदिरात ही द्वारयात्रा काढण्यात येईल, अशी माहिती चिंचवड देवस्थानच्या विश्वस्तांकडून देण्यात आली.

# विना परवाना झाडे तोडणाऱ्या कंपनी मालकासह दोघांवर गुन्हा दाखल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



एका खासगी कंपनीच्या आवारातील विना परवाना ८ झाडे तोडणाऱ्या कंपनी मालक आणि ठेकेदार अशा दोघांवर एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार बुधवारी (दि.१६) सायंकाळी एमआयडीसीतील कटफास्ट कंपनी, एफ-२ ब्लॉक, वंडरकार शोरूम जवळ घडला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाचे उद्यान सहाय्यक सुहास एकनाथ सामसे (वय ४७, रा. मनीष गार्डन, पिंपरी) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार कंपनी मालक सुरेश जे बजाज आणि ठेकेदार राजेंद्र बाबु मांजरे (वय ३५, रा. बौध्दनगर, – निगडी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एमआयडीसी एफ-२ ब्लॉकमधील कटफास्ट कंपनी समोरील फुटपाथवरील आणि आवारातील झाडे तोडल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. याची माहिती वृक्षप्रेमींनी महापालिका आयुक्तांसह उद्यान विभागाला दिली. त्यानुसार उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांनी एमआयडीसी येथे जावून पाहणी केली. कटफास्ट कंपनी समोरील फुटपाथवरील ४ मोहोगणी, १ कांचन, १ केशिया, १ रेनट्रीचे झाड तर कंपनीच्या आतील आब्यांचे १ झाड अशी ८ झाडे विना परवाना तोडल्याचे आढळून आले.



## भूमिका

# म्हादई व्याघ्रप्रकल्प व्हायलाच हवा !

**गोवा, या दोन अक्षरी शब्दाबाबत अनेकांच्या अनेक कल्पना आहेत. पण बहुतेकांची, म्हणजेच गोव्याबाहेरच्या लोकांची गोव्याची ओळख म्हणजे निळेशार समुद्रकिनारे, रेताळ किनारे, मासे, मदिरा, देवळे, चर्च, पार्टी, कॅसिनो हे म्हणजेच गोवा. त्यापलीकडे गोव्यात काही नाही. आणि असं वाटणं साहजिकच आहे.**

या सर्वांच्या पलीकडेही एक गोवा वसलेला आहे, जिथं सह्याद्रीच्या रांगा एकामागे एक चढत गेल्या आहेत. खळाळत्या बारमाही नद्या-ओढ्यांनी निसर्गाला समृद्ध केलं आहे. पश्चिम घाटाचे देखणे माथे, अनेक धबधबे, नेत्रावळी, म्हादईची कंच राने, वाघेरी, सोसोगडसारखे बेलाग गड ही विविधताही गोव्याने जतन केली आहे. गोव्याच्या एकूण भूभागाच्या एक चतुर्थांश प्रदेश सरकारी जंगलभाग असून त्यात कमालीची जैवविविधता आढळते. प्राणी, पक्षी, वनस्पती, वेली यांनी हा भाग परिपूर्ण असून त्याने निसर्गाचा समतोल राखला आहे. या भागात निसर्गाच्या, रानाच्या सानिध्यात रहाणारे इथले भूमिपूत्र या रानाचा श्वास आहेत. जगाच्या पाठीवर कुठेही गेलं तरी इतिहास हेच सांगतो की जंगलभागात रहाणारे हे लोक रानाचे खरे रखवाले आहेत. इथल्या वन्यजिवांसोबत सहजीवन जगत आले आहेत. त्यांना पूजत आले आहेत. आणि याच श्रद्धेतून वाघदेव असो की आणखी कोणी



पशू, त्यांची देवळं उभारून त्यांना देवत्व बहाल केलं गेलं आहे. मात्र अशा भागातून मिळणारा आर्थिक, राजकीय फायदा बघणाऱ्या काही मोजक्या लोकांकडून या लोकांच्या मनात रानाबद्दल, वाघाबद्दल आणि इतर प्राण्यांबद्दल गैरसमज पसरवले जातात. जुलै महिन्याच्या उत्तरार्धात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने गोव्यातील म्हादई वन्यजीव अभयारण्याला तीन महिन्यांत व्याघ्रप्रकल्प म्हणून घोषित करण्याचा आदेश गोवा सरकारला दिला. या निकालाबाबत गोव्यात संमिश्र प्रतिसाद पहायला मिळतो आहे. पर्यावरणप्रेमी आणि निसर्गअभ्यासक यांच्याकडून या निकालाचं स्वागत होत आहे तर राज्य सरकार या निर्णयविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा तयारीत आहे. हा व्याघ्रप्रकल्प इथल्या विकासाच्या आड येत असल्याचं सरकारचं म्हणणं आहे. म्हादई अभयारण्य हा व्याघ्रप्रकल्प म्हणून घोषित करावा किंवा त्याबाबत विचार करावा असे पत्र सुमारे १२ वर्षांपूर्वीच तत्कालीन वनमंत्री जयराम रमेश यांनी गोव्याच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पाठवलं होतं. त्याची फारशी दखल घेतली गेली नाही आणि कोणतंही सरकार आलं तरी याबाबतची त्यांची उदासीनता वेळोवेळी पहायला मिळाली. मुळात तेव्हाच्या केंद्रीय वनमंत्र्यांनी केलेल्या सूचनेला भक्कम आधार होता. गोव्याच्या रानात कायमच वाघ आहेत. तेव्हाही होते आणि आताही आहेत. उच्च न्यायालयाच्या ९५ पानी प्रदीर्घ अहवालाची सुरुवातच महाभारतातल्या एका दाखल्याने झाली आहे. 'ज्या रानात वाघ नसतील ते जंगल असुरक्षित असेल आणि जे जंगल असुरक्षित असेल त्यात वाघ असणार नाही' असा तो दाखला आहे. गोव्याच्या जैवविविधतेच्या संरक्षणाच्या दृष्टीने हा निकाल अतिशय महत्त्वाचा असून त्याची अंमलबजावणी केली गेली नाही तर त्याचे दूरगामी परिणाम पहायला मिळतील. या निकालाला अनुकूल पावलं उचलली तर मात्र इथल्या जैवविविधतेला आणि इथल्या जनतेलाही भविष्यात त्याचा चांगला परिणाम पहायला मिळेल. हा निकाल योग्य की अयोग्य ही चर्चा होणं खरं तर दुर्दैवी आहे कारण हा निकाल गोवा राज्याच्या फायद्याचा आहे.

या निकालाचं समर्थन किंवा विरोध करण्याची वेगवेगळी कारणं आहेत, ती नीट समजून घेतली पाहिजेत. गोव्यातला वाघ हा मुळात निवासी का बाहेरचा असा वाद सध्या निर्माण केला गेला आहे. अगदी अनादी काळापासून, म्हणजे मनुष्यवस्ती वसू लागल्याच्या आधीपासून जंगलं आणि वन्यजीव अस्तित्वात आहेत. या भागातले जंगलाचे सलग पट्टे हे अगदी पश्चिम घाटाची रांग निर्माण झाल्यापासून त्याच्या पश्चिम आणि पूर्व उतारावर पसरलेले आहेत. सदाहरित, निम्न सदाहरित, शुष्क पानगळी, आर्द्र पानगळी वनांनी ही जंगले समृद्ध आहेत. जिथं रानं, तिथं वन्यजीव हे समीकरण निसर्गतःच असून त्याबद्दल वाद असूच शकत नाही. तृणभक्षी प्राणी असतात तिथं, त्यांच्यामागे मांसभक्षी असतातच. गोव्याच्या सीमांना भिडणारा हा जंगलपट्टा थोडाथोडका नाही, तर ६०० किमी एवढा दक्षिणोत्तर पसरलेला आहे. आज या रानात मोठी जंगलतोड सुरू असली तरी नकाशात पाहिलं की जंगलाची ही सलगता ध्यानात येते.

## संपादकीय »

# पेर्ते व्हा..!

***रेवडीच्या नावे कितीही बोटे मोडली, कितीही आगपाखड केली तरी लोकशाहीत सामाजिक सुरक्षा देऊ करणाऱ्या योजनांची संभावना रेवडी म्हणून करता येत नाही..***

एरवी आषाढात बरसणाऱ्या पावसाने काही प्रमाणात अधिकाच्या श्रावणात आपली उपस्थिती नोंदवली आणि निज श्रावण सुरू होत असताना आकाशातील जलधारांऐवजी अंगे भिजली घर्मधारांनी अशी अवस्था झाली. कोसळल्याने ऑगस्टच्या सुरुवातीला काठोकाठ भरलेली महाराष्ट्रातील धरणे स्वातंत्र्यदिनी पुन्हा आकाशाकडे आ वासून पाहू लागली. तसेही या महिन्यात प्रशांत महासागरातील 'एल निनो' प्रवाहामुळे पाऊसपाणी कमी असेल असे भाकीत वर्तवले गेले होते. ते खरे होताना दिसते. त्यामुळे आतापर्यंत केलेल्या पेरण्यांचे काय याची चिंता शेतकऱ्यांस आणि त्यामुळे त्यावर आधारित अर्थव्यवस्थेस लवकरच पडू लागेल. शेतीचे चक्र एकदा का बिनसले की पुढच्या पावसाळ्यापर्यंत ते पुन्हा रुळांवर आणणे अवघड जाते. आताच चलनवाढीच्या वेगाने ७.४४ टक्क्यांचा टप्पा ओलांडल्याने रिझर्व्ह बँकेत धोक्याच्या घंटा वाजू लागल्या असतील.

**कंपनीच्या संचालकांनी निराकरण- अधिकाऱ्यांच्या विरोधात पोलिसांत तक्रारी दाखल केल्याची उदाहरणे आहेत, 'एनडी आर्ट वर्ल्ड'च्या प्रकरणात तर निराकरण-कंपनीच्या अध्यक्षांसह अनेक अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल झाले.. अशाने 'नादारी व दिवाळखोरी संहिते'चे गांभीर्य कमी होतेच; पण व्यवसायसुलभतेच्या बाबतीत देश मागे जाऊ शकतो. 'तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था' ठरण्याच्या स्वप्नालाच धक्का लागू शकतो..**

# 'दिवाळखोरी संहिते'शी खेळ नको!

गेल्या काही वर्षांत आपला देश जागतिक स्तरावरील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे. पुढील पाच वर्षांत आपण जगभरात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचू, असे आश्वासन पंतप्रधान मोदी यांनी यापूर्वीही देशवासीयांना दिलेले आहे आणि लाल किल्ल्यावरून केलेल्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात त्याचा पुनरुच्चारही त्यांनी केला आहे. देशाच्या आतापर्यंतच्या नेत्रदीपक प्रगतीचा मोठा भाग हा केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत वित्तीय क्षेत्रात केलेल्या संरचनात्मक सुधारणांमुळे (स्ट्रक्चरल रीफॉम्र्स) झाला आहे, हे मान्य करावे लागेल. केंद्र सरकारने आणि भारतातील नियामक संस्थांनी उचललेल्या विविध पावलांमुळे केवळ राष्ट्रीय स्तरावरच नव्हे, तर जागतिक स्तरावरही गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास वाढला आहे. यामध्ये नादारी व दिवाळखोरी संहितेचाही (आयबीसी) मोठा भाग




आहे. सरकारने आणलेली ही सुधारणा आपल्या वित्तीय चारित्र्यामध्ये परिवर्तन घडवू शकते, इतके तिचे महत्त्व आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे कर्जवाटप सुव्यवस्थित झाले, तसेच थकीत कर्जाचे (एनपीए) प्रमाण घटून परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली. मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यादेखील आता आपली कर्जे फेडण्याबाबत सजग झाल्या आहेत. यापूर्वीच्या काळात बँकांना या कॉर्पोरेट्सच्या बुडीत कर्जाचा फटका बसत असे. यापूर्वीही दिवाळखोरी आणि कर्ज-पुनर्रचना यांसाठीची सोय होती- नाही असे नाही.. पण या प्रक्रियेत सोयीचा भाग कमी होता, कारण नादारी आणि कर्ज-पुनर्रचनेची वैधानिक चौकट विविध कायद्यांमध्ये गुंतलेली असायची. त्यामुळे व्यवसायांना आणि बँकिंग क्षेत्राला थकीत कर्जाच्या प्रकरणांचा वेळेवर निपटारा करण्यात अनंत अडचणी येत असत. सुलभतेने व्यवसाय करण्याच्या (ईझ ऑफ डुईंग बिझनेस) मोहिमेत, केंद्र सरकारने नादारीविषयीचे कालबाह्य नियम बदलले आणि 'आयबीसी' अर्थात नादारी व दिवाळखोरी संहिता (इन्सॉल्व्हन्सी अ‍ॅण्ड बँकरप्सी कोड) लागू केली. भारतातील बँका आणि पतसंस्था यांच्यासाठी त्यातून आर्थिक आरोग्यरक्षणाचा पट उलगडला गेला. किंबहुना, जागतिक बँकेच्या 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'विषयीच्या आंतरराष्ट्रीय मानांकनात भारताची क्रमवारी १४२ वरून ६३वी झाली, त्यामागे याच सुधारणांचा मुख्य हातभार होता. आर्थिक विस्तार, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि ग्राहकांच्या वाढत्या आकांक्षा या सर्व गोष्टींमुळे कर्जाची भूक सतत वाढतच आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सांगली जि.प.ने दिग्गज साहित्यिकांचे बापच बदलले!

## » बालगंधर्वांना नागठाणेत जन्मास घातले

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्हा परिषदेचा ऑनलाइन चेहरा असलेल्या संकेतस्थळावर प्रशासनाने अनेक धमाल गमतीजमती करून ठेवल्या आहेत. जिल्ह्याची माहिती अपलोड करताना अगदीच पोरखेळ केला आहे. काही दिग्गज साहित्यिकांचे बाप बदलण्याच्या अक्षम्य चुका करून ठेवल्या आहेत, तर परजिल्ह्यातील काही साहित्यिक आमचेच म्हणून फुशारकी मारली आहे. पुरोगामी आणि प्रगतशील जिल्हा म्हणून मिरवणाऱ्या सांगली जिल्ह्याच्या अर्धवट ज्ञानाचे आणि बेजबाबदार वृत्तीचे दर्शन या संकेतस्थळावरून होत आहे.**




### अर्धवट ज्ञानवंतांची अर्धवट मुशाफिरी

» काही अर्धवट ज्ञानवंतांनी संकेतस्थळावर फुशारकी मारताना अनेक घोळ घातले आहेत. प्रख्यात लेखक वि. स. खांडेकर यांचे नाव विष्णू सखाराम खाडकर असे नोंदवले आहे. त्यांच्याविषयी नोंदवलेली माहिती अत्यंत असंबद्ध आणि बालिश आहे. नटसम्राट बालगंधर्वांचा जन्म पुण्यात झालेला असताना नागठाणे अशी चुकीची नोंद केली आहे. या सर्व साहित्यिकांना सांगली जिल्ह्याचे म्हणताना त्यांची गावे मात्र नोंदविलेली नाहीत. अण्णा भाऊ साठे यांचे नाव तुकाराम होते याचाही विसर पडला आहे. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष शंकरराव खरात यांचा समावेश 'साहित्य' ऐवजी 'कला' विभागात करून ठेवला आहे.

प्रख्यात ग्रामीण कथाकार शंकर पाटील हे सांगलीच्या मातीतले अद्वितीय रत्न असा टेंभा मिरवला आहे. प्रत्यक्षात त्यांचे गाव कोल्हापूर जिल्ह्यातील पट्टणकोडोली होय. त्यांच्या वडिलांचे नाव बाबाजी असे होते. जिल्हा परिषदेने बाबाजी ऐवजी खंडू यांनाच शंकर पाटलांचे बाप ठरवले आहे. संकेतस्थळावर नमूद असलेले शंकर खंडू पाटील हे संपादक होते. पण तेदेखील सांगलीचे नाहीत. ग्रामीण कथालेखनामध्येही त्यांचे नाव नाही. फोटो मात्र खऱ्याखुऱ्या ग्रामीण कथाकार शंकर पाटलांचाच ठेवला आहे. या दोन्ही व्यक्ती वेगवेगळ्या आहेत, हे त्यांच्या गावीही नसावे.

### चारुता सागरांचे वडीलही बदलले

» ग्रामीण कथालेखनात अमीट ठसा उमटवणारे चारुता सागर यांचे खरे नाव दिनकर दत्तात्रय भोसले होय. पण जिल्हा परिषदेने वडिलांचे नाव बदलून बाबाजी ठेवले आहे. विद्यापीठात अभ्यासल्या जाणाऱ्या चारुता सागरांचा फोटो ही संकेतस्थळावर माहिती देणाऱ्या बुद्धिवंतांना मिळू नये, यासारखी हतबलता नसावी. अनेक महिन्यांपासून याच नोंदी कायम असून बदलण्याची सद्बुद्धी कोणालाही सुचलेली नाही.

# दागिन्याची उधारी; दोघांना भोसकले

। आटपाडी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

ज्वेलर्समधून पाच वर्षांपूर्वी घेतलेल्या दागिन्यांची उधारी मागितल्याबद्दल शेटफळे (ता. आटपाडी) येथील सराफ सुरेश जयवंत गायकवाड (वय ४२) व हेमंत गायकवाड (३४) या दोघांना चाकू व खंजीरने भोसकले. तर, गायकवाड यांच्या चालकास बेदम मारहाण केली.

बुधवारी सायंकाळी हा प्रकार घडला. याप्रकरणी जखमी गायकवाड यांनी कोळे (ता. सांगोला) येथील संशयित रमेश आलदर, रावसो आलदर, बिरा खरात, नेताजी सरगर व अनोळखी तिघे अशा सात जणांविरुद्ध आटपाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी, फिर्यादी सुरेश गायकवाड यांचे आटपाडीमध्ये शुभम ज्वेलर्स नावाने सराफी दुकान आहे. या दुकानातून कोळे येथील एकाने सोने खरेदी केले होते. खरेदी केलेल्या सोन्याची काही रक्कम येणे बाकी होती. त्यामुळे गायकवाड हे काही महिन्यांपासून उधारीवर नेलेल्या ग्राहकांकडे पैशाची मागणी करत होते.

दरम्यान, बुधवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास शेटफळे येथे सुरेश गायकवाड यांच्या घरासमोर संशयित रमेश आलदर, रावसो आलदर, बिरा खरात, नेताजी सरगर आणि तिघे जण आले होते. सुरेश गायकवाड यांना पैसे देण्याच्या बहाण्याने घराबाहेर बोलावले. तेव्हा चाकूने त्यांच्या हातावर व पोटावर वार केले. गायकवाड यांच्या गाडीवरील चालकाला मारहाण केली.

तसेच, हेमंत गायकवाड हा भांडण सोडवण्यासाठी गेला असता त्याच्यावरही धारदार शस्त्राने वार केला. तसेच, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले आहे. सुरेश गायकवाड यास जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच, त्यांचे मित्र बाळासाहेब जगदाळे यांची जीप (एमएच १० सीआर १२३) ची काच फोडून मोडतोड केली. त्यानंतर हल्लेखोर पसार झाले. हल्ल्यातील जखमींवर आटपाडी येथील खासगी दवाखान्यात उपचार करण्यात आले. घटनास्थळी पोलिस उपविभागीय अधिकारी पद्मा कदम, पोलिस निरीक्षक शरद मेमाणे यांनी भेट दिली. सहायक निरीक्षक दत्तात्रय कोळेकर तपास करीत आहेत.

# महापौरांवर नाराजी, आयुक्तांवर स्तुतीसुमने!

## » सांगली महापालिकेच्या सभेत रंगला सर्वपक्षीय कौतुक सोहळा

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पालिका सदस्यांच्या निरोपाच्या सभेत स्वकीयांनी सोडलेल्या टीकास्त्रामुळे गुरुवारी महापौर दिग्विजय सूर्यवंशी घायाळ झाले. पुढील आठवड्यापासून पालिकेत प्रशासकराज येणार असल्याची धास्तीही सदस्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. त्यासाठीच आयुक्त सुनील पवार यांच्या कारभारावर स्तुतीसुमने उधळत भविष्यातही विकासकामांना निधी मंजूर करावी, अशी साद घालण्यात आली.**




काँग्रेस, राष्ट्रवादी व भाजपच्या सदस्यांना एकमेकांचे कौतुक करीत पाच वर्षातील कामांना उजाळा दिला. महापालिकेच्या विद्यमान नगरसेवकांची मुदत १९ रोजी संपणार आहे. तत्पूर्वी गुरुवारी पालिकेची यंदाच्या कार्यकाळातील शेवटची सभा महापौर सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सुरुवातीला प्रशासनाच्यावतीने आयुक्त पवार यांनी सर्व नगरसेवकांना स्मृतीचिन्ह, गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. पाच वर्षे सभागृहात एकमेकांची उणीदुणी काढण्यात कोणताही कसर न सोडणारे नगरसेवकही आज कौतुकाचे पोवाडे गात होते. प्रतिस्पर्धी पक्ष असूनही भाजपचे सदस्य महापौरांसह काँग्रेस-राष्ट्रवादीने सहकार्य केल्याचे सांगितले. तर दोन्ही काँग्रेसचे सदस्यांनी भाजपचे शेखर इनामदार, स्थायी सभापती धीरज सूर्यवंशी, गटनेत्या भारती दिगडे यांच्या सहकार्याबद्दल स्तुतीसुमने उधळली. याचवेळी राष्ट्रवादीच्या नर्गिस सय्यद यांनी महापौरांच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. गेल्या अडीच वर्षात एक-दोनदा महापौर दालनात गेले. महापौरांनी कधीही निधी दिला नाही, विचारपूस केली नाही, अशी खंत व्यक्त केली. महापौर निवडीवेळी भाजपची साथ सोडून राष्ट्रवादीला मतदान करणाऱ्या विजय घाडगे यांनी महापौरांवर टीकास्त्र सोडले. भाजपने माझ्यावर विश्वास टाकला होता. पण तत्कालीन परिस्थितीमुळे मी महापौर निवडीवेळी राष्ट्रवादीला मतदान केले.

### कुणावरही अन्याय केला नाही : घाडगे

» मैनुद्दीन बागवान महापौर होणार असल्याने राष्ट्रवादीकडे झुकलो होते. पण मतदान सूर्यवंशी यांना करावे लागले. ती चुक होती, अशी जाहीर कबुलीही दिली. राष्ट्रवादीचे शेडजी मोहिते यांनी महापौरांच्या बाजू उचलून धरली. सूर्यवंशी यांनी सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. कुणावरही अन्याय केला नाही, असे सांगत घाडगे यांचा आरोप खोडून काढण्याचा प्रयत्न केला.

# निवडणुकीआधी केंद्र सरकार सक्रिय!

## » महागाई रोखण्यासाठी 1 लाख कोटी निधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकार निवडणुकीपूर्वी महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी सक्रिय झाले आहे. सूत्रांनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील आठवड्यामध्ये पेट्रोलच्या विक्रीवरील कर कमी करणे, खाद्यतेल व गव्हावरील आयात शुल्क कमी करणे आदी मोठे निर्णय घेऊ शकतात.**

इतकेच नाही तर केंद्र सरकारचे अधिकारी अन्न व इंधनाच्या खर्चातील वाढ रोखण्यासाठी विविध मंत्रालयांच्या बजेटमधून सुमारे एक लाख कोटी रुपयांचा निधी पुन्हा वितरित करण्याची योजना आखत आहेत.

एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, हा निधी एकूण बजेटच्या २% आहे. याचा वापर गरिबांसाठी स्वस्त कर्ज व घर उपलब्ध करून देण्यासाठी केला जाऊ शकतो. या आठवड्यात पंतप्रधानांनी ७७व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त दिलेल्या भाषणात १५ महिन्यांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचलेल्या महागाईचा सामना करण्याची घोषणा केली आहे. यामुळे नोकरदार वर्गात उत्सुकता वाढली आहे.

तथापि, सरकारकडे किमती कमी करण्यासाठी काही महिनेच शिल्लक आहेत. अन्य एक अधिकारी म्हणाले, देशाच्या अनेक भागात पाऊस व पुरामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. त्यामध्ये टोमॅटो आणि कांद्याचा प्रामुख्याने समावेश आहे.



सरकारने महागाई कमी करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. साठेबाजांवर कारवाई केल्याने किमती कमी होतील. २०२२ मध्ये गव्हाच्या निर्यातीवर निर्बंध लावल्यानंतर सरकारने गेल्या महिन्यात काही प्रकारच्या तांदळाच्या शिपमेंटवरही बंदी घातली आहे. तसेच काही खाद्य पदार्थांच्या साठवणुकीवरही निर्बंध लावले आहेत. देशातील पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी अन्नधान्य महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार रशियाकडून स्वस्त दरात गहू खरेदी करण्यासाठी चर्चा करत आहे. प्रत्यक्षात मर्यादित पुरवठ्यामुळे देशात घाऊक गव्हाच्या किमती दोन महिन्यांत १० टक्क्यांनी वाढल्या आहेत. त्यामुळे जुलैमध्ये महागाईचा दर १५ महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला आहे.महागाईचा गरीबांवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी रशियाकडून ९० लाख मेट्रिक टन गहू आयात करण्याची सरकारची योजना आहे.

### रशियाहून गहू आयात करण्याची तयारी

» देशातील पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी अन्नधान्य महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार रशियाकडून स्वस्त दरात गहू खरेदी करण्यासाठी चर्चा करत आहे. प्रत्यक्षात मर्यादित पुरवठ्यामुळे देशात घाऊक गव्हाच्या किमती दोन महिन्यांत १० टक्क्यांनी वाढल्या आहेत. त्यामुळे जुलैमध्ये महागाईचा दर १५ महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला आहे.महागाईचा गरीबांवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी रशियाकडून ९० लाख मेट्रिक टन गहू आयात करण्याची सरकारची योजना आहे.


# लालूंची अडचण वाढणार?

## » जामीनाविरोधात कोर्टात सुनावणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चारा घोटाळा प्रकरणी राष्ट्रीय जनता दलाचे (आरजेडी) सुप्रिमो लालू प्रसाद यादव यांचा जामीन रद्द करण्यासाठी सीबीआयने शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका स्वीकारली आहे. त्यावर 25 ऑगस्टला सुनावणी होणार आहे झारखंड उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देत तपास यंत्रणेने सर्वोच्च न्यायालयाकडे जामीन रद्द करण्याची मागणी केली आहे. झारखंड उच्च न्यायालयाच्या जामीन आदेशाचा आधार चुकीचा असल्याचे सीबीआयने याचिकेत म्हटले आहे. लालू यादव यांनी शिक्षेनुसार तुरुंगवास भोगलेला नाही, असे म्हटले आहे..**



### आधी फेटाळली होती याचिका

» यापूर्वी चारा घोटाळा प्रकरणी 27 मार्चला लालूप्रसाद यादव यांनी सुप्रीम कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला होता. चारा घोटाळ्याशी संबंधित डोरंडा कोषागार प्रकरणात लालू यादव यांना नोटीस जारी करण्याबाबतची सीबीआयची याचिका फेटाळण्यात आली होती. अशा प्रकारचे प्रकरण आधीच प्रलंबित असल्याचे कोर्टाने म्हटले होते.

झारखंड उच्च न्यायालयाने गेल्या वर्षी एप्रिलमध्ये या प्रकरणाची सुनावणी करताना लालू यादव यांनी अर्धी शिक्षा भोगली असल्याचे सांगितले होते. त्यामुळे लालू यादव यांना 30 एप्रिल 2022 रोजी जामीन मंजूर करण्यात आला. चारा घोटाळा प्रकरणी राष्ट्रीय जनता दलाचे (आरजेडी) सुप्रिमो लालू प्रसाद यादव यांचा जामीन रद्द करण्यासाठी सीबीआयने शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका स्वीकारली आहे. त्यावर 25 ऑगस्टला सुनावणी होणार आहे झारखंड उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देत तपास यंत्रणेने सर्वोच्च न्यायालयाकडे जामीन रद्द करण्याची मागणी केली आहे. लालू जवळपास 3 वर्षे रांची तुरुंगात होते. यापूर्वी चारा घोटाळा प्रकरणी 27 मार्चला लालूप्रसाद यादव यांनी सुप्रीम कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला होता. चारा घोटाळ्याशी संबंधित डोरंडा कोषागार प्रकरणात लालू यादव यांना नोटीस जारी करण्याबाबतची सीबीआयची याचिका फेटाळण्यात आली होती. अशा प्रकारचे प्रकरण आधीच प्रलंबित असल्याचे कोर्टाने म्हटले होते.

झारखंड उच्च न्यायालयाने 22 एप्रिल 2022 ला लालू यादव यांना चारा घोटाळा प्रकरणी जामीन दिली होती. लालू सध्या आरोग्याच्या कारणामुळेच जामीनावर बाहेर आहेत. सीबीआयने झारखंड उच्च न्यायालयाच्या याच निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

# खरगे यांनी राज्यसभेत घेतला आक्षेप!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

विशेषाधिकार समिती आज (18 ऑगस्ट) काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांना लोकसभेतून निलंबित करण्याबाबत चर्चा करणार आहे. अधीर रंजन यांना 10 ऑगस्ट रोजी पावसाळी अधिवेशनात लोकसभेत निलंबित करण्यात आले होते. लोकसभेत अविश्वास प्रस्तावावर झालेल्या चर्चेदरम्यान अधीर रंजन चौधरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली होती. प्रकरण विशेषाधिकार समितीकडे आहे. काँग्रेस नेते म्हणाले होते- 'मणिपूर आणि हस्तिनापूरमध्ये काही फरक नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी नीरव मोदीसारखे शांत बसले आहेत. नीरव म्हणजे गप्प बसणे. माझा उद्देश पंतप्रधानांचा अपमान करण्याचा नव्हता.

संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सभागृहात स्थगन प्रस्ताव मांडताना सांगितले की, काँग्रेस नेते प्रत्येक वेळी देशाची आणि सरकारची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी आम्ही माफीची मागणी केली होती, मात्र त्यांनी माफी मागितली नाही. त्यांच्या विरोधात ठराव मांडण्यात आला, तो मान्य करण्यात आला. सभापती ओम बिर्ला म्हणाले की, अधीर रंजन चौधरी यांचे वर्तन सदनाला अनुरूप नाही. त्याच दिवशी (10 ऑगस्ट) काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी विरोधी सदस्यांच्या निलंबनाचा मुद्दा उपस्थित केला. हात जोडून सभापती जगदीप धनखड यांना म्हणाले, 'कृपया माझा माइक बंद करू नका.' खरगे बोलण्यासाठी उठताच सभापतींनी त्यांना थांबवले.

खरगे पुढे म्हणाले, 'उद्या करायचे असेल तर आजच करा, असे आमचे मत आहे. आजच करायचं असेल तर आत्ताच करा. कयामत क्षणात होईल, मग कधी करणार. साहेब, वादात छोट्या छोट्या गोष्टी होत राहतात. एकमेकांबद्दल बोलताना ते असंसदीय असेल, कुणाला दुखावलं असेल, तर त्याला असंसदीय म्हणता येईल. हे योग्य नाही.

# प्राजक्ताचा नवा सिनेमा

सध्या मराठी सिनेसृष्टीला पुन्हा चांगले दिवस आलेत असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. बाईपण भारी देवा सिनेमाने बॉक्स ऑफीसवर ७६ कोटींचा गल्ला जमवला आहे. सैराटनंतर बाईपण भारी देवा हा मराठी मनोरंजन विश्वातला सर्वाधिक कमाई करणारा सिनेमा ठरलाय. आता आणखी एक लय भारी सिनेमा मराठी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा सिनेमा म्हणजे तीन अडकून सीताराम... तीन अडकून सीताराम... नाव ऐकून जरा वेगळंच वाटलं ना? हे असं कसं नाव? तर हा कोल्हापूरातील एक वाक्प्रचार आहे. अर्थात याचा अर्थ तुम्हाला हा चित्रपट आल्यावरच कळेल. सुप्रीम मोशन पिक्चर्स प्रा. लि. आणि नितीन वैद्य प्रोडक्शन्स प्रस्तुत 'तीन अडकून सीताराम' या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन हृषिकेश जोशी यांनी केले असून लालासाहेब शिंदे, राजेंद्र शिंदे आणि नितीन वैद्य या चित्रपटाचे निर्माते आहेत. या चित्रपटात कोण प्रमुख भूमिकेत दिसणार हे जाणून घेण्यासाठी मात्र थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. दुनिया गेली तेल लावत, अशी टॅगलाईन असणारा हा चित्रपट २९ सप्टेंबर रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येईल. नुकत्याच झळकलेल्या 'तीन अडकून सीताराम' चित्रपटाच्या पोस्टरमध्ये तीन अंक दर्शवणारा एक हात दिसत असून त्या हातात बेडी दिसत आहे. तर बेडीच्या दुसऱ्या बाजुला स्माईली दिसत आहे. याचा नेमका संबंध काय, याचे उत्तर चित्रपट पाहिल्यावरच मिळेल. हृषिकेश जोशी हे नेहमीच हटके विषय हाताळतात, त्यामुळे या चित्रपटातही काहीतरी भन्नाट पाहायला मिळणार हे नक्की! चित्रपटाबद्दल दिग्दर्शक हृषिकेश जोशी म्हणतात, "संपूर्ण कुटुंबासोबत पाहावा, असा हा विनोदी चित्रपट आहे. प्रत्येक वळणावर प्रेक्षकांची उत्सुकता वाढेल. चित्रपटाचे निर्माते अतिशय ताकदीचे आहेत. त्यांनी आजवर मराठी सिनेसृष्टीला अनेक दर्जेदार चित्रपट दिले आहेत. अशा निर्मात्यांसोबत काम करताना चांगली ऊर्जा मिळते. साहजिकच त्याने उत्कृष्ट कलाकृती प्रेक्षकांसमोर सादर होते. एकंदरच चित्रपटाची संपूर्ण टीम भारी आहे. हळूहळू एक एक गोष्टी समोर येतीलच."



# रणबीर -आलियाची नव्या घराची पाहणी

बॉलीवूडचे लोकप्रिय कपल आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांनी गुरुवारी संध्याकाळी त्यांच्या नवीन घराच्या बांधकामाची पाहणी केली. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावरून समोर आला आहे, ज्यामध्ये दोघेही त्यांच्या घराच्या बांधकामाच्या ठिकाणी दिसत आहेत. व्हिडिओत आलिया आणि रणबीर पांढऱ्या पोशाखात ट्विनिंग करताना दिसत होते. रणबीर पांढरा शर्ट आणि काळ्या पँटमध्ये दिसला. यासोबत त्याने टोपी घातली आहे. तर आलिया भट्ट पांढरा टी-शर्ट आणि डेनिम शॉर्ट्समध्ये दिसली, ज्यामध्ये ती खूप क्यूट दिसत आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, रणबीर कपूर आणि आलिया भट्ट या वर्षाच्या अखेरीस नीतू कपूर आणि त्यांची मुलगी राहासोबत त्यांच्या नवीन घरात राहायला येण्याची अपेक्षा आहे. 1980 मध्ये रणबीर कपूरचे आई-वडील ऋषी कपूर आणि नीतू कपूर यांनी पाली हिलवर एक बंगला खरेदी केला होता जो ऋषी यांचे आई-वडिल राज आणि कृष्णा कपूर यांच्या नावावर होता. आता तो पाडून नव्याने बांधला जात आहे. न्यू कृष्णराज बंगला 8 मजल्यांचा आहे. गेल्या तीन वर्षांपासून या घराची पुनर्बांधणी सुरू आहे. रणबीर आणि आलियाने गेल्या वर्षी 14 एप्रिल रोजी कुटुंबीय आणि जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत लग्न केले होते.



# OMG- 2 साठी अक्षयने मानधन घेतले नाही?

अक्षय कुमारचा OMG 2 सिनेमा सध्या चांगलाच चर्चेत आहे. लैंगिक शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयावर सिनेमा भाष्य करतो. OMG 2 च्या विषय, आशय कलाकारांचा अभिनय अशा विविध विषयांचं कौतुक होतंय. अशातच अक्षय कुमारने OMG 2 साठी अजिबात मानधन घेतलं नाही, अशी गोष्ट सध्या चांगलीच व्हायरल झालीय. यात खरंच तथ्य आहे का? असा खुलासा चक्क OMG 2 च्या निर्मात्यांनी केलाय. OMG 2 चे निर्माते अजित अंधारे यांनी 'पिंकविला'शी बोलताना सांगितले की, अक्षय कुमारने OMG 2 साठी एक रुपयाही घेतला नाही. उलट, हा चित्रपट बनवताना आर्थिक आणि क्रिएटिव्ह पातळीवरील जोखीम आहे, याची त्याला जाणीव होती. त्यामुळे या चित्रपटाच्या संपूर्ण प्रकियेत अक्षय निर्मात्यांच्या पाठीशी उभा राहिला. अजित पांढरे म्हणाले, "अक्षय आणि आमचे अनेक वर्षांपासुनचे संबंध आहेत. 'ओएमजी', 'स्पेशल 26' आणि 'टॉयलेट: एक प्रेम कथा''च्या वेळेपासून आम्ही एकमेकांसोबत काम करत आहोत. मी सुरुवातीपासुन एका हटके तरीही अर्थपूर्ण स्क्रीप्टसाठी अक्षयच्या पाठीशी कायम उभा आहे. अक्षयशिवाय OMG 2 चा हा धोका पत्करणे अशक्य होते. अक्षय या चित्रपटात (OMG 2) आर्थिक आणि सर्जनशीलपणे सहभागी होता. अक्षय कुमारच्या OMG 2 या चित्रपटाचे सर्वजण कौतुक करत आहेत. या चित्रपटाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहेत. आता सहा दिवसांत OMG 2 या चित्रपटाने 50 कोटींपेक्षा जास्त कमाई केली असून आता सिनेमा 100 कोटींच्या कमाईच्या दिशेने वाटचाल करत आहे. गदर 2 आणि OMG 2 या दोन्ही चित्रपटात स्पर्धा लागली असली तरी यात सनी देओलच्या गदर 2 ने चांगली कमाई करत OMG 2 ला मागे टाकले आहे. आता या सिनेमाला मिळणारी लोकप्रियता पाहून अखेर अक्षय कुमारने देखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. अक्षयने सोशल मिडीयावर व्हिडिओ शेयर करत लिहिलं की, 'ओह माय गदर'वर एवढ्या प्रेमाचा वर्षाव केल्याबद्दल आणि भारतीय चित्रपट इतिहासातील सर्वोत्तम आठवडा दिल्याबद्दल प्रेक्षकांचं खूप खूप आभार. प्रेम आणि कृतज्ञता.' यात अक्षयने OMG 2 आणि गदर 2 या चित्रपटांचे प्रमोशनही केले आहे.

# प्रार्थनाच्या पोस्टमुळे रंगली चर्चा!

मराठी मनोरंजन विश्वात बऱ्याच अभिनेत्री आहेत ज्यांनी आपल्या सौंदर्याच्या आणि अभिनयाच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यात एक आघाडीचं नावं म्हणजे अभिनेत्री प्रार्थना बेहरे. छोट्या पडद्यावरुन अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवणाऱ्या प्रार्थना बेहेरेने अल्पावधितच तिच्या अभिनयानं प्रेक्षकांची मनं जिंकली. तिने 'मितवा' या चित्रपटातुन मराठी चित्रपसृष्टीत पदार्पण केलं. काही दिवसांपुर्वी तिने 'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेत काम केले. या मालिकेतील तिच्या नेहाच्या पात्राने तिला घराघरात लोकप्रिय केले. नेहमी चर्चेत राहणारी प्रार्थना ही सोशल मीडियावर देखील खुप सक्रिय असते. ती नेहमीच तिचे फोटो आणि व्हिडिओ चाहत्यांसोबत शेयर करत असते. तिचे चाहतेही तिच्याबद्दल जाणुन घेण्यासाठी उत्सूक असतात.

अशातच प्रार्थनाची एक इंस्टास्टोरी सध्या चर्चेचा विषय बनली आहे. तिने तिच्या स्टोरीत लिहिलं की, 'जर तुम्हाला वजन कमी करायचं असेल तर त्यासाठी व्यायाम किंवा डाएट करण्याची काही गरज नाही. त्यासाठी फक्त एखाद्या चुकीच्या माणसाच्या प्रेमात पडा'. तिने ही पोस्ट शेयर केली आहे आणि त्यासोबत हसण्याचा इमोजी देखील शेयर केला आहे.



# मेहमूदवर जडला होता जीव

बॉलीवूडच्या प्रसिद्ध अभिनेत्री अरुणा ईराणी यांच्याविषयी जेवढं बोलावं तेवढं कमी आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी आपल्या अभिनयानं प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. कधी विनोदी तर कधी गंभीर अशा वेगवेगळ्या भूमिकांमधून त्यांनी आपले वेगळेपण जपले आहे. बॉलीवूडमध्ये कित्येक सेलिब्रेटींचे सिक्रेट्स हे नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. त्यामध्ये बिग बी अमिताभ बच्चन आणि रेखाजी, सलमान खान आणि ऐश्वर्या, अभिषेक बच्चन आणि राणी मुखर्जी, यांच्याविषयीच्या अफेअर्सच्या चर्चा चाहत्यांच्या गॉसिपचा विषय असतो. यासगळ्यात अरुणा ईराणी यांच्याविषयी एक गोष्ट सांगितली जाते. त्यांच्या मनात एका व्यक्तीविषयी हळवा कोपरा होता. त्याबद्दल त्यांनी सांगितलेही होते. टीव्ही मनोरंजन ते चित्रपट विश्वात

# एशियन गेम्स : भारताला मोठा धक्का!

## डोपिंगमध्ये अडकली द्युती चंद: चार वर्षांची बंदी

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**भारताचा नॅशनल रेकॉर्ड होल्डर आणि स्टार ॲथलीट द्युती चंद हिच्यावर डोपिंगमध्ये दोषी आढळल्या प्रकरणी चार वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. डिसेंबर महिन्यात द्युतीने चाचणीसाठी दिलेल्या नमुन्यात SARM आढळले. द्युतीची चार वर्षांची बंदी ३ जानेवारी २०२३ पासून लागू होईल.**

द्युती चंदने २०२१ सालच्या ग्रां प्रीमध्ये १०० मीटरची शर्यत ११.१७ सेकंदात पूर्ण करून राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला, जो अजूनही कायम आहे. तिच्या या डोपिंग टेस्ट मध्ये दोषी आढळल्याने भारताच्या पदकांच्या आशांना धक्का बसला आहे. ऐन आशियाई क्रीडा स्पर्धा तोंडावर असताना आलेला हा निकाल म्हणजे क्रीडा प्रेमींसाठी खूप निराशाजनक आहे. भारतीय धावपटू द्युती चंदवर ४ वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. डोपिंगमुळे तिच्यावर बंदी घालण्यात आल्याने पुढील वर्षी पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये देखील ती सहभागी होऊ शकणार नाही. द्युतीची चाचणी झाली. त्यात सिलेक्टिव्ह एंड्रोजन रिसेप्टर मॉड्युलेटर (एसएआरएम) आढळले. द्युतीवर लादलेली चार वर्षांची बंदी जानेवारी २०२३ पासून विचारात घेतली जाईल. २०२१ मध्ये त्याने ग्रां प्रीमध्ये १०० मीटरची शर्यत ११.१७ सेकंदात पूर्ण करून राष्ट्रीय विक्रम केला. द्युतीने अनेक प्रसंगी चांगली कामगिरी करत देशाची मन उंचावली आहे. द्युतीने २०१८ आशियाई क्रीडा स्पर्धेत १०० मीटर आणि २०० मीटरमध्ये दोन सुवर्णपदके जिंकली होती. गेल्या वर्षी ५ आणि २६ डिसेंबर रोजी नाडाच्या अधिकाऱ्यांनी द्युतीचा नमुना घेतला होता. त्यांच्या पहिल्या नमुन्यात अँडारिन, ऑस्टारिन आणि लिंगंड्रोल आढळून आले, तर दुस-या नमुन्यात अँडारिन आणि ओस्टारिन देखील आढळले. निर्णयानंतर सात दिवसांच्या आत तिचा बी नमुना चाचणीसाठी सादर करण्याचा पर्याय द्युतीकडे होता, परंतु तिने तसे केले नाही. त्यामुळे नाडाने त्याच्यावर बंदी घातली. द्युती सध्या राष्ट्रीय शिबिराचा भाग नाही किंवा राष्ट्रीय प्रशिक्षक एन. रमेश यांच्यासोबत प्रशिक्षणही घेत नाही.



डोपिंग विरोधी अपील पॅनेलच्या निर्णयाविरुद्ध अपील करण्यासाठी द्युतीकडे आता २१ दिवसांचा अवधी आहे. यात जर ती यशस्वी झाली तर तिच्यावरील चार वर्षाची बंदी हटवली जाऊ शकते. मात्र, सध्या तरी ते कठीण देशात आहे. द्युती चंदवरील बंदी म्हणजे तिची कारकीर्द जवळपास संपल्यात जमा अशा स्वरुपाची आहे. २७ वर्षीय दुतीची बंदी संपेपर्यंत ती ३१ वर्षांची असेल. अशा स्थितीत तिला पुनरागमन करणे सोपे जाणार नाही.

द्युती आधीच आशियाई खेळातून बाहेर आहे, आता तिच्या ऑलिम्पिकमध्ये जाण्याच्या आशा जवळपास संपल्या आहेत. विशेष म्हणजे द्युती चंद यांनी दमदार कामगिरीच्या जोरावर अनेक प्रसंगी तिरंगा फडकवला आहे. २०१८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत त्याने रौप्यपदक जिंकले. त्याने १०० मीटर आणि २०० मीटरमध्ये दोन पदके जिंकली.

याआधी २०१३ मध्ये पुण्यात झालेल्या आशियाई चॅम्पियनशिपमध्ये त्याने कांस्यपदक जिंकले होते. २०१७ मध्ये भुवनेश्वरमध्येही तिने कांस्यपदक जिंकले आहे. द्युतीने दक्षिण आशियाई खेळ २०१६ मध्ये रौप्य पदक जिंकले होते. १०० मीटर शर्यतीसाठी ती सापडली. यासह २०० मीटर शर्यतीत कांस्यपदक पटकावले.

### द्युतीकडे 21 दिवस आहेत

» निर्णयानंतर सात दिवसांच्या आत तिचा बी नमुना चाचणीसाठी सादर करण्याचा पर्याय द्युतीकडे होता, परंतु तिने तसे केले नाही. त्यामुळे नाडाने त्याच्यावर बंदी घातली. द्युती सध्या राष्ट्रीय शिबिराचा भाग नाही किंवा राष्ट्रीय प्रशिक्षक एन. रमेश यांच्यासोबत प्रशिक्षणही घेत नाही. डोपिंग विरोधी अपील पॅनेलच्या निर्णयाविरुद्ध अपील करण्यासाठी द्युतीकडे आता २१ दिवसांचा अवधी आहे. यात जर ती यशस्वी झाली तर तिच्यावरील चार वर्षाची बंदी हटवली जाऊ शकते. मात्र, सध्या तरी ते कठीण देशात आहे.

# अर्शदीप बुमराहचा विक्रम मोडेल?

## आशिया कपमध्ये बुमराहची खरी चाचणी

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**आयर्लंड दौऱ्यावरील तीन सामन्यांच्या टी२० मालिकेला शुक्रवारपासून सुरूवात होत आहे. या मालिकेत वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग आपलाच कर्णधार जसप्रीत बुमराहचा मोठा विक्रम मोडण्याच्या जवळ पोहचला आहे. तो टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान ५० विकेट्स घेणारा गोलंदाज आहे. अर्शदीप सिंग बुमराहला मागे टाकून या यादीत पहिल्या क्रमांकावर पोहोचण्याच्या अगदी जवळ आहे.**



### वेगवान 50 विकेट्स घेणारा गोलंदाज

» टीम इंडियासाठी सर्वात वेगवान ५० विकेट्स घेणारा गोलंदाज कुलदीप यादव आहे, ज्याने त्याच्या २९व्या टी२०मध्येच ५० विकेट्स घेतल्या. दुसऱ्या क्रमांकावर फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहल आहे, त्याने ३४व्या टी२० सामन्यात ५० विकेट्स घेतल्या. बुमराह तिसऱ्या तर अर्शदीप सिंग चौथ्या क्रमांकावर आहे. अर्शदीप सिंग लवकरच बुमराहचा हा विक्रम मोडू शकतो, असे झाल्यास तो तिसऱ्या क्रमांकावर जाईल.

या मालिकेद्वारे जसप्रीत बुमराह ११ महिन्यांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करत आहे. बुमराहच्या नेतृत्वाखाली अर्शदीप सिंग स्वतःचा एक मोठा विक्रम रचण्याच्या जवळ आहे. अर्शदीप सिंगला पुढील ९ टी२० सामन्यांमध्ये हा विक्रम मोडण्यासाठी केवळ २ विकेट्स घ्यायच्या आहेत. अर्शदीप सिंगची गोलंदाजी पाहता तो बुमराहचा आयर्लंडविरुद्धचा विक्रम सहज मोडू शकतो. जसप्रीत बुमराह सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये टीम इंडियासाठी सर्वात वेगवान ५० विकेट्स घेणारा गोलंदाज आहे. त्याने आपल्या ४१व्या टी२० सामन्यात ५० विकेट्स घेतल्या आहेत. मात्र, अर्शदीप सिंगच्या नावावर ३१ सामन्यांमध्ये ४८ विकेट्स असून त्याला पुढील ९ सामन्यांमध्ये केवळ २ विकेट घ्यायच्या आहेत. अर्शदीप सिंगचा रेकॉर्ड खूप चांगला आहे, तो सुरुवातीला विकेट्स घेण्यात माहीर आहे. त्याने २ विकेट्स घेतल्यास तो बुमराहला मागे टाकून टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वात वेगवान ५० विकेट्स घेणारा गोलंदाज ठरेल. जसप्रीत बुमराहने आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या टी२० सामन्यापूर्वी सांगितले की, “जेव्हा तो एनसीए सराव करत होता, तेव्हापासूनच त्याने विश्वचषकाची योजना आखायला सुरूवात केली होती. मी १०, १२ किंवा १५ षटके टाकायचो, टी२० फॉरमॅटमध्ये पुनरागमनाची तयारी करत नव्हतो.” सर्वांच्या नजरा विश्वचषकासाठी भारतीय संघाच्या घोषणेकडे लागल्या आहेत, ज्यामध्ये बुमराहचे पुनरागमन पाहिले जाऊ शकते.

# महाराष्ट्राच्या तुषारने भेदले पदकाचे लक्ष्य



**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील अमरावतीच्या युवा तिरंदाज तुषार शेळकेने पॅरिसमध्ये आयोजित तिरंदाजीच्या वर्ल्डकप स्टेज-४ मध्ये अचूकपणे पदकाचे लक्ष्य भेदले. त्याच्या लक्षवेधी कामगिरीतून भारतीय संघ रिकर्व्हच्या सांघिक गटामध्ये कांस्यपदकाचा मानकरी ठरला आहे. तुषार शेळकेने आपले सहकारी धीरज बोम्मादेवारा आणि अतानू दाससोबत सांघिक कांस्यपदकाची कमाई केली. भारतीय पुरुष संघाने गुरुवारी कांस्यपदकाच्या प्लेऑफमध्ये स्पेन टीमचा पराभव केला. भारताने ६-२ अशा फरकाने एकतर्फी विजयाची नोंद केली. यासह भारतीय पुरुष संघ पदक विजेता ठरला आहे. भारताला २ कांस्यपदके; महिला संघही चमकला : झारखंडच्या अंकिता भगतने दर्जेदार कामगिरीची लय कायम ठेवत भजन कौर, सिमरनजित कौरसोबत महिला गटात भारताला कांस्यपदक जिंकून दिले. भारतीय संघाने पदकाच्या लढतीत मेक्सिकोवर ५-४ ने मात केली. यासह भारताच्या नावे पुरुष व महिला गटात प्रत्येकी एक कांस्यपदक नोंद झाले.